# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.७९/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल: sec.corp@mah.gov.in
दिनांक : १४ डिसेंबर, २०२५

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय :- २९ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी २७ महानगरपालिकांच्या मुदती संपलेल्या आहेत तर २ महानगरपालिका नवनिर्मित आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या याचिका क्रमांक-१९७५६/२०२१ सोबत जोडलेल्या याचिकांमध्ये विविध मुद्दे आव्हानित असून या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ६ मे, २०२५ व दि.१६ सप्टेंबर, २०२५ रोजी दि.३१ जानेवारी, २०२६ पर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याचे निर्देश दिले आहेत. उपरोक्त याचिकांवर पुढील सुनावणी दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी होणार आहे.

२. प्रभागरचना प्रसिध्दीची कार्यवाही नगर विकास विभागाकडून पूर्ण झाली असून, राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार आरक्षणाची अंतिम प्रसिध्दी देखील करण्यात आली आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम स्वतंत्ररित्या जाहिर

करण्यात येईल. मात्र, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन पूर्वतयारीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

३. उपरोक्त निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी दक्षता व काळजी घेण्यात येते, ती सर्व दक्षता व काळजी या निवडणुकांमध्येदेखील घेणे बंधनकारक आहे. तरी संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे.

४. प्रत्यक्ष निवडणूक -

४.१ अ) निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे-

निवडणुकांचे कामकाज कर्तव्यदक्ष, निपःक्ष अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत पार पाडणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्याच्यादृष्टीने निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी यांचा आढावा घेऊन आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांची बदली / पदस्थापना करण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२५/ प्र.क्र.६/का.५, दि. १६ जुलै, २०२५ अन्वये दिलेल्या आदेशांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

(ब) निवडणूक निर्णय अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत -

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.५/का.५, दि. ६ ऑगस्ट, २०२५ व दि.२८ ऑगस्ट, २०२५ ची सुधारणाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता १० ते १२ प्रभागांकरिता एक तर इतर महानगरपालिकांकरिता शक्यतो ३ प्रभागांकरिता व अपवादात्मक परिस्थितीत ४ प्रभागांकरीता एक याप्रमाणे उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती

करावयाची आहे. जर उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतील, तर अन्य महानगरपालिकेतील उपायुक्तांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास १ याप्रमाणे तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ म्हणून व महानगरपालिकेतील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ व ३ म्हणून नियुक्ती करावी. निवडणुकांसाठी आवश्यक असलेले निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी इ. उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची आहे. त्याचबरोबर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नसल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त व विभागीय आयुक्त यांनी आपसात योग्य तो समन्वय साधून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल याची खात्री करावी. विभागीय आयुक्तांनी उपलब्ध करुन दिलेल्या अधिकाऱ्यांची महानगरपालिका आयुक्त, निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करतील. तसेच त्यांना योग्य ते प्रभाग नेमून देतील.

(ii) महानगरपालिका क्षेत्रातील मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्रांसाठी पुरेसे अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात. यावेळी किमान १० टक्के कर्मचारीवृंद अधिक्याने नेमण्यात येईल याची काळजी घ्यावी. तसेच निवडणूक कामासाठी आवश्यक इतर कर्मचारीवृंद यांची सेवा अधिग्रहित करावी. पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक पोलीस कर्मचारीवृंदाची नियुक्ती करण्याबाबत निर्देशित करावे.

(iii) निवडणुकीचे काम करण्यासाठी आवश्यक ते अधिकारी / कर्मचारी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२/०३/१९९५ तसेच शुध्दीपत्रक क्र. एसईसी/झेडपीपीएस/२०१७/ प्र.क्र.४४/का.७, दि. १८/७/२०१८ अन्वये अधिग्रहित करण्यात याव्यात.

(iv) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Disciplinary Action with Suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. तरी आयोगाच्यावतीने महानगरपालिका आयुक्त यांनी आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दिनांक ०२/०८/२००६ लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(क) अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत-

महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व विषयावर योग्य ते प्रशिक्षण द्यावे. उदा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाची ओळख व जबाबदारीची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने सर्व कायदेशीर तरतुदी तसेच आयोगाच्या आदेशांबाबतची माहिती द्यावी. बृहन्मुंबई वगळता इतर महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती असल्याने प्रत्येक मतदारास ३, ४ किंवा ५ मते द्यावी लागतील. या सर्व बाबी विचारात घेऊन खालील नमूद विषयांबाबतचे विशेष प्रशिक्षण द्यावे :-

(i) बहुसदस्यीय प्रभागांमध्ये करावयाच्या मतदानाबाबत.

(ii) नामनिर्देशनपत्र, शपथपत्र व अन्य नमुने उपलब्ध ठेवणे.

(iii) आयोगास विविध टप्प्यांवर द्यावयाच्या अहवालाची पध्दती ( संगणकीय प्रणालीचा वापर)

(iv) आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि. ४ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे आदेश विचारात घ्यावेत.

(v) कायदा व सुव्यवस्थेबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि. ४ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे आदेश विचारात घ्यावेत.

(vi) आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना.

(vii) जाहिरात प्रमाणन, पेड न्यूज, समाजमाध्यमे, जनमत आणि मतदानोत्तर चाचणी, जाहिरात प्रसिध्दीचा कालावधी, प्रसार माध्यमांसाठी सुविधा इ. बाबींच्या अनुषंगाने क्र.रानिआ/मावज/ २०२५/ प्र.क्र.५ /का-१०, दि.९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ निर्गमित करण्यात आले आहेत.

(viii) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

(ix) मतदान केंद्राध्यक्ष व इतर अधिकाऱ्यांसह सर्वांना मतदान यंत्र हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण, इत्यादी.

(ड) प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे –

राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम शासन राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असते. तरी त्यानुसार निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यासंदर्भात योग्य ती उपाययोजना वेळीच करुन ठेवावी.

(इ) नामनिर्देशनपत्र, शपथपत्र व इतर नमुने आणि माहितीपुस्तिका तयार ठेवणे बाबत –

आगामी निवडणुकीमध्ये उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र दाखल करण्यासाठी पारंपरिक (offline) पध्दतीने नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचे नमुने

उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सदर नमुने घेऊन नामनिर्देशनपत्र भरुन तसेच शपथपत्र भरुन ते सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन विहित वेळेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करावयाचे आहे. याकरीता महानगरपालिकेने नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचे नमुने व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी तसेच अन्य नमुने उदा. उमेदवारी मागे घेणे, निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी यांच्या नियुक्त्या, मतपत्रिकेवर नाव छापण्याचा नमुना, पक्षाच्या उमेदवाराने द्यावयाचे जोडपत्र- १ व जोडपत्र- २, इत्यादी तसेच महत्त्वाचे आदेश उदा. निवडणूक खर्च मर्यादा, निवडणूक खर्च दाखल करण्यासंदर्भातील नमुने, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, जाहिरात प्रमाणन आदेश इत्यादी आदेशांच्या प्रति अथवा त्यांचे संदर्भ देऊन माहितीपुस्तिका तयार करावी. माहितीपुस्तिकेमध्ये प्रभागांचा एकत्रित नकाशा, प्रभागनिहाय आरक्षण, अनामत रक्कम, अहर्ता-अनहर्ता तरतुदी, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचा पत्ता, त्यांना नेमून दिलेले प्रभाग, मदत कक्षाचा संपर्क क्रमांक इत्यादी माहिती देता येईल. सदर माहितीपुस्तिका रुपये १००/- इतकी किंमत आकारुन उपलब्ध करुन देता येईल. राज्य निवडणूक आयोगाने दि. १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये नामनिर्देशनपत्र व शपथपत्र यांची अद्ययावत नमुने दिले आहेत.

५. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना –

(i) महानगरपालिकांच्या मागील निवडणुकांमधील मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ करण्याच्यादृष्टीने महानगरपालिकेने सर्व प्रयत्न करणे आवश्यक राहील. तसेच Ethical Voting म्हणजे निवडणुकीमधील नैतिकता वाढविण्याच्यादृष्टीने सर्व संबंधितांची मदत घेऊन (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, बँका, हॉटेल्स,

रेस्टॉरन्टस इत्यादी) मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा. उदा. पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मीडिया, इत्यादी.

६. मतदान प्रक्रिया :-

६.१ मतदान केंद्र निश्चितीबाबत –

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ / मनपा-२०२५ / प्र.क्र.३ / का.५, दि. २६ जून, २०२५ व दि.२९ ऑगस्ट, २०२५ ची सुधारणा अन्वये महानगरपालिकांमध्ये प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या खालीलप्रमाणे सुधारीत केली आहे :-

अ) बृहन्मुंबई महानगरपालिका - ११०० ते १२००

ब) इतर महानगरपालिका - चार सदस्य - ८०० ते ९००,

तीन सदस्य - ९०० ते १०००, पाच सदस्य - ७०० ते ८००

६.२ मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयी-सुविधा :-

महानगरपालिका निवडणुकांकरिता निश्चित करण्यात येणाऱ्या मतदान केंद्रांबाबत दि.२६ जून, २०२५ च्या आदेशामधील मार्गदर्शक तत्वानुसार मतदान केंद्राचे स्थान तसेच त्या मतदान केंद्रांवर पुरवावयाच्या सोयी-सुविधा याबाबत सविस्तर आदेश दिले आहेत. शक्यतोवर अशी सर्व मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्रे असतील याकरीता त्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक असलेल्या किमान सुविधा निश्चितपणे उपलब्ध असतील याची खात्री महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

(i) संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची यादी निश्चित करुन त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

(ii) मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पहाणी करुन सदर मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सोयी-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत, इ.सुविधा असल्याबाबत खात्री करावी.

(iii) आपल्या महानगरपालिका क्षेत्रात आदर्श मतदान केंद्र तयार करण्याकामी नाविन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात.

(iv) निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार करावी (Commissioning of EVM) व ती सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था करावी.

(v) कोणत्याही कारणास्तव निवडणुकीच्या कालावधीत संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

७. मतदान साहित्य व निवडणुकीशी संबंधित इतर साहित्य -

राज्य निवडणूक आयोगाने दि. २१ ऑगस्ट, २०२५ च्या परिपत्रकान्वये निवडणुकांरीता साहित्य उपलब्ध करुन घेणे. छपाई करुन घेणे तसेच अन्य मतदान साहित्य यांच्या खरेदी संदर्भात कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार आवश्यक साहित्य व छपाई वेळीच करुन ठेवावी.

८. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत तसेच पितळी सील पुरवठयाबाबत:-

(i) महानगरपालिकांच्या निवडणूका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे निवडणुका घेण्यासंदर्भात कार्यवाही करावी. मतदान केंद्रांच्या संख्येचा आढावा वेळीच घेण्यात यावा. उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या माहितीसह निवडणुकीसाठी आवश्यक मतदान यंत्रांची संख्या व त्यासाठी लागणारे इतर साहित्य (पेपरसील, पट्टीसील, स्पेशल टॅग, मार्कर पेन) इ. बाबतची माहिती आयोगास ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी. जेणेकरुन मतदान यंत्र व इतर साहित्याची

व्यवस्था वेळेत करण्यात येईल. तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुरक्षिततेसाठी सुस्थितीत असलेल्या स्ट्राँग रुमची व्यवस्था करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्रमांक- रानिआ / मनपा-२०१० / प्र.क्र.१० / का.०५, दि.१९/११/२०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य आहे किंवा कसे याची आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

(iii) संबधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यकतेनुसार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना पितळी सील वेळेत पुरवावेत.

९. मतदान यंत्राच्या सर्व बॅलेट युनिट वरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत -

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०२५/प्र.क्र.११/का-१४, दि.२७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत आदेश काढले आहेत. त्यामुळे END बटणाचा वापर या निवडणुकीत होणार नाही. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्त यांनी सदर आदेश सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावेत. मतदान यंत्र तयार करताना (Commissioning of EVM) कॅन्डीडेट सेटींग झाल्यानंतर बॅलेट युनिट सील करण्यापूर्वी, बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

१०. स्ट्राँगरुम -

मतदानानंतर मतदान यंत्रे कोणत्या ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात येतील. याबाबत वेळीच उपाययोजना करुन ठेवावी व त्याठिकाणी आवश्यक स्ट्राँगरुम तसेच स्ट्राँगरुमच्या ठिकाणी आवश्यक असलेली सुरक्षाव्यवस्था व खबरदारीच्या उपाययोजना करुन ठेवाव्यात.

११. मतमोजणी :-

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/ मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५, दि. २१ डिसेंबर, २००९ व दि. २९ मार्च, २०१० तसेच आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२५/का.५, दि. १८ फेब्रुवारी, २०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी. मतमोजणीच्यावेळी अनावश्यक गर्दी / गोंधळ होणार नाही यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

प्रमाणपत्रे - निवडून आलेल्या उमेदवारांना देण्याकरीता विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे तयार ठेवावीत.

मेमरी चिप्स - निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या काढता येणाऱ्या मेमरी चीप्स मतमोजणीनंतर आयोगाच्या निर्देशानुसार सुरक्षित, सीलबंद स्वरुपात ठेवण्यात याव्यात.

१२. आचारसंहिता -

१२.१ आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी-

सद्यस्थितीत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पोलीस, उत्पादन शुल्क व इतर संबंधित विभागांकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. परंतु प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही कालावधी लागतो. त्यामुळे निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यानंतर अशी कार्यवाही सुरु केल्यास निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापर्यंत अशा सर्वच प्रकरणांना अंतिम स्वरुप दिले जाणे शक्य होत नाही. परिणामी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यामागील उद्देश सफल होत नाही. ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(i) पोलीस विभाग, उत्पादन शुल्क विभाग व इतर संबंधित विभागाने सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु कराव्यात. उदा. :-

अ) ज्या लोकांमुळे ( उदा. सराईत गुन्हेगार, फरार घोषित, परागंदा गुन्हेगार, संशयीत गुंड प्रवृत्तीचे लोक इ.) निर्भय, मुक्त व पारदर्शकरितीने निवडणुका

घेण्यामध्ये अडथळा येऊ शकेल अशा संशयित लोकांची यादी तयार करुन चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र लिहून घेणे, तडीपारी करणे, इ.

ब) प्रलंबित वॉरंट / चलान बजावून पुढील कार्यवाही करणे.

क) मुंबई दारुबंदी अधिनियमान्वये प्राप्त झालेल्या अधिकारात धाडी घालणे, नवीन केसेस दाखल करणे व अशा प्रकरणात (जुनी व नवीन) निर्णय घेणे.

ड) पूर्वीच्या प्रलंबित निवडणूक गुन्ह्यांचा / दाव्यांचा पाठपुरावा करणे.

(ii) विमानतळ, रेल्वे, उत्पादन शुल्क, वन विभाग, नेव्ही, कोस्टगार्ड, इ. विभागांशी समन्वय साधून पैशाची व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक व अन्य संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवणे.

(iii) निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या पार पाडल्या जाव्यात यादृष्टीने वरील सर्व बाबींवर तार्किक (Logical) कार्यवाही प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी .

१२.२ राज्य निवडणूक आयोगाने दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ च्या अदेशान्वये कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार करावयाच्या आवश्यक उपाययोजना.उदा. :-

i. व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक-(Video Surveillance Team)
ii. भरारी पथक (Flying Squad)
iii. चेक पोस्टसाठी पथक (Statistic Surveillance Team)
iv. तक्रार निवारण कक्ष-

वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी सल्लामसलत करून योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा.- नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व

शस्त्रधारी पोलीस, इत्यादी. तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करून द्यावी.

१२.३ आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना - या विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करून खालील विषयाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी, उदा:-

(i) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या, मद्य (Liquor), पैसा इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) उमेदवारांकडून निवडणुकांमध्ये होणाऱ्या खर्चाची नोंद योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे.

(v) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(vi) अशा सर्व व्यवहार व हालचालींवर जसे तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचेवर लक्ष ठेवणे.

(vii) बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

१२.४ जाहिरात प्रमाणन समिती गठित करणे-

जाहिरात प्रमाणन, पेड न्यूज, समाजमाध्यमे, जनमत आणि मतदानोत्तर चाचणी, जाहिरात प्रसिध्दीचा कालावधी, प्रसार माध्यमांसाठी सुविधा इ. बाबींच्या अनुषंगाने

क्र.रानिआ / मावज / २०२५ / प्र.क्र.५ / का-१०, दि.९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ निर्गमित करण्यात आले आहेत, त्या अन्वये समितीचे गठन तात्काळ करावे.

१२.५ स्वेच्छा निधीतून खर्च करण्यास मनाई :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून, यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून कोणत्याही लोकप्रतिनिधींना (मंत्री व राज्यमंत्रीसह) त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर स्वेच्छा निधीतून खर्च करता येणार नाही असे आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क., दि. ५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये आदेशित केले आहे. सदर आदेशातील सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१२.६ आचारसंहिता क्षेत्र -

महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रामध्ये आचारसंहिता लागू राहील. निवडणुका असलेले महानगरपालिका क्षेत्र वगळता अन्य क्षेत्रात आचारसंहिता लागू नसल्यामुळे संबंधित जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये म्हणजेच त्या जिल्ह्यातील जिल्हापरिषद / पंचायत समिती (जिथे आचारसंहिता लागू नाही तिथे), नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात (जिथे आचारसंहिता लागू नाही तिथे) नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु निवडणुका असलेल्या महानगरपालिकेतील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

१२.७ आचारसंहितेचा कालावधी-

राज्य निवडणूक आयोग ज्यावेळी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करेल त्या दिनांक व वेळेपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

१२.८ आचारसंहितेचे आदेश -

आयोगाचे क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का.७, दिनांक ०४/११/२०२५ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास महानगरपालिका आयुक्त यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मार्गदर्शनाकरिता राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे आचारसंहितेप्रकरणी परस्पर संदर्भ करु नये. मंत्रालयीन विभागांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीमार्फतच आचारसंहितेसंदर्भातील प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठवावेत.

१२.९ खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे-

निवडणुकीसाठी आचारसंहिता कालावधीत मतदारांना प्रभावित करण्याकरिता तसेच प्रलोभन देण्यासाठी उमेदवारांकडून तसेच राजकीय पक्षांकडून नवनवीन उपाययोजना करण्यात येतात. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या विविध निकालांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेबाबत उपाययोजना करण्यात येतात. त्याचधर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दक्षता घेण्यात यावी.

१३. निवडणूक खर्च -

१३.१ निवडणूक खर्च सादर न केल्यास अनर्ह ठरविणे - सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२, दि. २ मे, २००८ अन्वये महानगरपालिका निवडणूक लढविणाऱ्या

उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि. १५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये कार्यवाही करावी.

१३.२ निवडणूक खर्च मर्यादा - उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा/२०२५/प्र.क्र.४५/का-५, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ मध्ये नमूद केल्यानुसार राहील. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या अद्ययावत आदेशानुसार याबाबत कार्यवाही करावी.

१३.३ निवडणूक खर्च सादर करण्याचा कालावधी - या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष(ब), दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४ नुसार सविस्तर कार्यवाही निश्चित करून दिली आहे. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने दैनंदिन खर्चाचा हिशोब निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा ते प्राधिकृत करतील अशा महानगरपालिका उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे.

१४. नामनिर्देशनपत्र, शपथपत्र इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत-

१४.१ उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र

(ब) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे शपथपत्र

(क) मतदार अन्य प्रभागातील असल्यास मतदार यादीचा उतारा

(ड) शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र

(इ) पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्यास त्याबाबत “जोडपत्र-१” व “जोडपत्र-२”

(ई) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ( जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केल्याची पावती व हमीपत्र)

(उ) इतर आवश्यक केलेली कागदपत्रे

१४.२ हेल्प डेस्क व प्रशिक्षण -

सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ. भरण्यात अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक किंवा आवश्यकतेप्रमाणे त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाला पुरविण्यात आलेल्या पोलीस सुरक्षा व्यवस्थेमुळे इच्छूक उमेदवारांना मदत कक्षात जाण्यास अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

१४.३ स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही -

उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र विहित करण्यात आलेल्या नमुन्यात भरुन स्वत:ची स्वाक्षरी करुन व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का-०५, दि.८/१/२०१५ च्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही.

१४.४ जातवैधता प्रमाणपत्र -

राखीव प्रभागातून सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत

जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतूद आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ११, दि.०३ नोव्हेंबर, २०२५)

१४.५ पक्षाच्या उमेदवाराने द्यावयाचे जोडपत्र -

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ०५ मे, २०२५ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार आवश्यक ती प्रमाणपत्रे व पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत पक्षाचा अध्यक्ष, सचिव किंवा सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने शाईचे अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेले "जोडपत्र-२" उमेदवाराने विहित मुदतीत सादर करावे. राजकीय पक्षांनी, विहित नमुन्यातील पक्षाचा अध्यक्ष / सचिव यांनी बॉलपेनने स्वाक्षरी केलेले, "जोडपत्र-१" विहित मुदतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. मात्र, यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दि.०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

१४.६ शौचालयाच्या वापराबाबतचे प्रमाणपत्र -

महानगरपालिका निवडणुकांकरीता निवडणूक लढविणारा उमेदवार शौचालयाचा नियमित वापर करीत आहेत इ. बाबतचे महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्याचे किंवा अशा व्यक्तीचे स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४.७ उमेदवारी मागे घेणे -

उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरीता असलेल्या माहिती पुस्तिकेतील विहित नमुन्यात घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलव्दारे देता येणार नाहीत.

१४.८ नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास -

आयोगाच्या क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६, दिनांक २७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. ५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

याबाबत सर्व राजकीय पक्षांना व उमेदवारांना लेखी सूचित करण्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी कराव्यात.

१४.९ नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-

नामनिर्देशनपत्र भरण्याच्यावेळी अनेक उमेदवारांनी अर्ज भरुन देखील एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवार ज्यावेळी अर्ज मागे घेतात, त्यावेळी सदर उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे असे प्रसंग घडल्यास आयोगास सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/ का.०५, दिनांक २३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

१५. मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदारांना फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे. यासाठी संगणकीकृत मतदार यादी

करताना व्होटर स्लिप तयार करावी. महानगरपालिकेतील सर्व मतदारांना १०० टक्के व्होटर स्लिपचे वाटप मतदानाच्या तारखेपूर्वी निश्चितपणे होईल याची खबरदारी महानगरपालिकेने घ्यावी.

१६. मतदार जनजागृती आणि शिक्षण (Education & Voters awareness)

१६.१ मा. सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील अपिल क्र. ७१७८/२००१ दि. २ मे, २००२ च्या आदेशानुसार उमेदवारांची माहिती मतदारांना असणे हा मतदारांचा हक्क असल्याबाबत निर्वाळा दिलेला आहे. त्या अनुषंगाने उमेदवाराकडून त्याच्या शैक्षणिक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत शपथपत्र घेण्यात येते. याबाबतचे आयोगाचे आदेश क्र. रानिआ / मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५, दि. १३ ऑगस्ट, २०१८ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या परिशिष्ट - १ मधील शपथपत्राच्या गोषवाऱ्यास खालीलप्रमाणे प्रसिध्दी देण्यात यावी :-

i) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचना फलकावर

ii) संबंधित महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर

iii) स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरातीद्वारे (संकेतस्थळावर तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील सूचनाफलकावर उपलब्ध असल्याची जाहिरात द्यावी.)

१७. निवडणूक निरीक्षक :-

निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य निवडणूक निरीक्षक / निवडणूक निरीक्षक इ. नेमण्यात येणार आहेत. निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांसाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्थेबरोबर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश इत्यादी कामांवर त्यांनी लक्ष ठेवावयाचे आहे.

१८. निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत:-

(i) राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या निवडणूक कार्यक्रम देण्यात येईल. त्यानंतर आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती -

(अ) महानगरपालिकांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी तसेच

(ब) राज्य निवडणूक आयोगास ई-मेलद्वारे तात्काळ पाठवावी.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्रांचा ताबा घेणे, मतदान यंत्रांवर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी. यासंदर्भातील आयोगाचे दि.२४/१०/२०१६ व दि. ०९/११/२०१६ चे आदेश पहावेत.

(v) निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत:-

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधित अधिनियम / निवडणूक नियमातील तरतुदीनुसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

१९. इतर

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

"…. The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party,

howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party, howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be able to secure an advantage over others by virtue of its superior financial strength...

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions... The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country..."

(ii) हे सर्व लक्षात घेता सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कोणत्याही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षाबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(iii) हयाकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत.

२०. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे महानगरपालिका आयुक्त व निवडणुकीशी संबंधित इतर सर्व अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-

(अ) श्री.एल.आर,शिवराम गौडा व इतर वि. टी.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र.४२७२/१९९१- "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत..."

(ब) श्री.एम.एस.गिल रिट याचिका क्र. १२९७/१९७७ - उद्भवलेली अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेशा" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार. (आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र.१०/सं.क, दि. ०४/१०/२०१६)

(क) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६०६/१९९३ भारत सरकारविरुध्द एम.एस.गिल याप्रकरणी दि.२१/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दि.०२/०८/२००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र. ४/२००१/जेएस-२, दि.०७/०२/२००१)

२१. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक:-

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाचे संकेतस्थळ व ई-मेल पुढीलप्रमाणे आहेत:-

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | : https://mahasec.maharashtra.gov.in |
| ई-मेल | : sec.corp@mah.gov.in |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकांणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्रे :- परिशिष्ट १

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

त्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित पोलीस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलीस दल उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-३३,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२
४. सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. विभागीय आयुक्त, सर्व
७. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर व चंद्रपूर.
८. पोलीस आयुक्त / अधिक्षक, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर व चंद्रपूर.
९. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.

त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिकांना आवश्यक साधनसामग्री विनाविलंब पुरवावी.

१०. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई -५१
११. उपायुक्त, (मतदान यंत्र व साहित्य वाटप), राज्य निवडणूक आयोग,

त्यांना कळविण्यात येते की, संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून ई.व्ही.एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग व मार्कर पेनची मागणी प्राप्त करुन घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.
१४. निवड नस्ती

परिशिष्ट-१

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.७९ /का.५, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

| महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीचा गोषवारा | | | | | | | |
| प्रभाग क्रमांक. व नाव (असल्यास -) | | | | | | | |
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता (कमाल) | मालमत्ता जंगम एकूण रुपये (रु.लाखात) | मालमत्ता स्थावर एकूण रुपये (रु.लाखात) | दायित्वे/थकीत रकमा (रु.लाखात) | गुन्हेगारी | |
| | | | | | | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणाची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणाची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

| | |
|---|---|
| Disclaimer (अस्वीकरण) | १) सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१ (युनियन ऑफ इंडिया वि. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक रिफॉर्म व इतर) मधील दि.२ मे, २००२ च्या न्यायालयीन निर्णयाच्या आधारे |
| | २) वरील गोषवारा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्रामधील माहितीच्याआधारे देण्यात आला आहे. |
| | ३) उमेदवारांच्या मूळ शपथपत्राची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनाफलकावर / संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| | ४) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रातील माहिती चुकीची आहे असे प्रतिस्पर्धी उमेदवारास वाटत असल्यास त्याबाबत शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करता येते. |

दिनांक-

निवडणूक निर्णय अधिकारी.......... महानगरपालिका